# महिला रुग्णांनी धरला गाण्याचा ठेका

## सध्या 'ना सासर ना माहेर' तरीसुद्धा कोविड सेंटरमध्ये गीतांचे स्वर

**येरवडा, ता. १४ :** 'जाते माहेराला, जाते माहेराला,
विठू माऊलीला, जाते भेटायला,
झाडझुड पान सांगा पाखरांनो
हीच वाट जाते कारे पंढरीला...

सासर ना माहेर तरीसुद्धा येथे श्रावणातील गाण्यांचा सूर घुमला होता. महिलांनी फेर धरून गाणी म्हटली, फुगड्या खेळल्या आणि काही क्षण त्या कोविड केअर केंद्रात उपचार घेत असल्याचे पूर्णतः विसरून गेल्या होत्या.

सासर असो की माहेर महिला नागपंचमीला धमाल करतात. फेर धरून गाणी म्हणतात. फुगड्या खेळतात, झोक्यावर झुलतात. मात्र, येरवड्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर कोविड रुग्णालयात उपचार घेणाऱ्या महिला नागपंचमीच्या दिवशी माहेर आणि सासरची आठवण काढत हिरमुसल्या होत्या. येथील डॉक्टर व परिचारिकांनी त्यांना कोरोनाच्या नियमांचे पालन करून, सभागृहात मुक्तपणे गाणी, फुगड्या विविध खेळ खेळण्याची मुभा दिली. त्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.



येरवडा : डॉ. बाबासाहेब आंबेडकर कोविड रुग्णालयातील महिलांनी नागपंचमीनिमित्त फेर धरून गाणी म्हटली, फुगड्या खेळल्या आणि काही क्षण आनंदात घालवले.

डॉ. आंबेडकर कोविड रुग्णालय हे पुणे महापालिका आणि सीवायडीए यांच्यावतीने सुरू आहे. या रुग्णालयाला गिव्ह इंडिया, ऑक्सफॅम, क्विकहिल, ऑक्वेन आणि सेव्ह द चिल्ड्रेन अशा विविध संस्थांनी मदत केली आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. निहारिका बुद्धिसागर, प्रिया गजभिये, सपना मेढे यांनी परिश्रम घेतले.

> नागपंचमीला घरी मेंदी काढतो, बांगड्या भरतो, खेळ खेळतो. येथे सण साजरा होईल असे वाटले नव्हते. मात्र, रुग्णालयात सर्वांनी मिळून गाणी म्हटली, फुगड्या खेळलो. त्यामुळे घरी असल्यासारखे वाटले.
>
> – महिला रुग्ण